**<u>सुधारित आदेश दिनांक २७/०४/२०१९</u>**

जा.क्र.पोसआ/ ४०६८ /२०१९
पोलीस सह आयुक्त, पुणे शहर
यांचे कार्यालय, दिनांक :- २७/०४/२०१९

<u>विषय</u> :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मतदान केंद्राचे १०० मीटर चे परिक्षेत्रातील व्यवसायीक दुकाने व आस्थापना बंद ठेवणे बाबत आदेश.

संदर्भ :- १. इकडील कार्यालयाचे पत्र क्रमांक ३१५७/२०१९ दिनांक १२/०४/२०१९.
२. वरिष्ठ पोलीस निरीक्षक हडपसर पोलीस स्टेशन पुणे यांचेकडील जावक क्रमांक ४०५ /२०१९ दिनांक २४/ ०४/२०१९

<u>आदेश,</u>

या कार्यालयाचे संदर्भ क्र.१ अन्वये निर्गमित केलेल्या आदेशाचे अवलोकन करावे. सदर आदेशात ७१ मतदान केंद्रांचे (इमारतीचे) १०० मीटर परिसराचे आतील सर्व व्यवसायिक दुकाने, रेस्टॉरन्ट, टप-या (अत्यावश्यक सेवा वगळून) सर्व आस्थापना बंद ठेवणेबाबत नमूद करण्यात आलेले आहे.

परंतू संदर्भ क्र.२ अन्वये हडपसर पोलीस स्टेशन पुणे शहर चे कार्यक्षेत्रात एक मतदान केंद्र वाढल्याने संदर्भ क्र.१ अन्वये काढलेल्या आदेशात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात ७२ मतदान केंद्रावर (इमारत) व ४४१ बुथवर दिनांक २९/०४/२०१९ रोजी मतदान होणार आहे. मतदान सुरळीत व शांततेत पार पाडणेसाठी, सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये, सार्वजनिक शांतता बिघडू नये यासाठी सदर मतदान केंद्रांच्या परिघापासून १०० मीटर सभोवतालच्या परिसराच्या जागेचा प्रचारासाठी व इतर कारणांसाठी गैरवापर होण्याची दाट शक्यता असल्याने सदर मतदान केंद्राचे १०० मीटर परिसरात निर्बंध घालणे जरूरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, अतिरिक्त कार्यभार पोलीस सह आयुक्त पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ साठी पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील ७२ मतदान केंद्र (इमारत) व ४४१ बुथवर १०० मीटर परिसरात दिनांक २९/०४/२०१९ रोजी ००.०१ वा. पासून ते मतदान प्रक्रिया संपेपर्यंत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

१) ७२ मतदान केंद्रांचे (इमारतीचे) १०० मीटर परिसराचे आतील सर्व व्यवसायीक दुकाने, रेस्टॉरन्ट, टप-या, (अत्यावश्यक सेवा वगळून) सर्व आस्थापना बंद ठेवावेत.

वरील आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील.
सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दिनांक २७/०४/२०१९ रोजी दिला आहे.

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :- २७/०४/२०१९

(प्रदिप देशपांडे)
अपर पोलीस आयुक्त,गुन्हे
अति.कार्यभार पोलीस सह आयुक्त, पुणे शहर